"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 02, Mar.-Apr. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

प्रारंभीचे स्त्रीवादी लेखन

डॉ. सय्यदा अनिस फतेमा
प्राचार्य
डॉ. रफ़िक़ झकारिया कॉलेज फॉर वूयमेन
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

मंगल काकासाहेब मुळे
संशोधक
राज्यशास्त्र विभाग
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

डॉ. सय्यद मुज्तबा कादरी
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
मौलाना आझाद कॉलेज
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

ksijmr.com

प्रस्तावना :

आधुनिक काळामध्ये स्त्रीवादी या विचारप्रवाहाचा उदय १९६० नंतर झाला असला तरी अगदी मध्ययुगीन काळापासून या दिशेने लेखन झालेले दिसते. या लेखामध्ये या लेखनाचा आढावा घेतलेला आहे. प्रवीण चव्हाण यांच्या 'प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध' (२०११) या पुस्तकात त्यांनी मध्ययुगीन काळापासून ते २० व्या शतकापर्यंत जगभरात झालेल्या स्त्रीवाद लेखन साहित्याचा आढावा घेतला आहे. त्यातील काही निवडक पुढीलप्रमाणे.

ख्रिस्तीन डी पिझॉ :

स्त्रीवादी लेखनातील आदय नाव म्हणजे फ्रान्सची ख्रिस्तीन डी पिझॉ (इ.स. १३६५ ते १४३०) होय. ख्रिस्तीन डी पिझॉने शहरातील स्त्रियांचे पुस्तक या पुस्तकाचे लेखन केले. स्त्रियांना दुय्यम, कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या हा काळ होता. ख्रिस्तीने स्त्रिया शिक्षण घेण्यासाठी पुरूषांप्रमाणेच सक्षम आहे असे मांडले. [१]

खितीन आपल्या पुस्तकात मांडते की, सर्व स्त्रिया- मग त्या उमराव, बुइर्वा अथवा कनिष्ठ वर्गातील असोत, त्या सर्वांना हेच सांगण आहे की, त्यांनी आपल्या शत्रूपासून स्वत:च्या प्रतिष्ठेचा आणि चारित्र्याचा बचाव केला पाहिजे हे स्त्रियांनो, पहा... पुरूष कसे सर्वत्रच स्त्रियांना दुर्बळ ठरवण्यासाठी उतावळे झाले आहेत. स्वत:चे सद्गुण व्यक्त करून हे पुरूष कसे खोटारडे आहेत, हे दाखवून द्या. [२]

फ्रान्सुआ पुले द ला बार:

इ.स. १६४७ ते इ.स. १७२३ या काळात होऊन गेलेल्या फ्रान्सच्या फ्रान्सुआ पुले द ला बार ने दोन लैंगिकतेच्या समानतेविषयी या पुस्तकात लैंगिकतेमुळे ज्ञानग्रहाण करण्याच्या क्षमता ठरतात. या गृहितकाला छेद दिला. त्यांनी कॅथलिक तत्त्वांना अनेक प्रश्न विचारले आणि स्त्रियांच्या स्थितीविषयी तार्किक स्पष्टीकरणे देण्याचा प्रयत्न केला. स्त्री - पुरूषांना ज्ञान मिळविण्याचा समान अधिकार आहे हे त्यांनी मांडले. [३]

मेक्सिकोच्या सोर जुआन इनेस द ला क्रुझ या इ.स. १६५१ ते इ.स. १६९५ मध्ये होऊन गेल्या त्यांनी स्त्रियांच्या बुध्दिमत्तेचे समर्थन केले. त्यासाठी बायबलमधील अनेक शहाण्या विद्यवान स्त्रियांचे दाखले दिले. सुरुवातीच्या काळातील ख्रिश्चन ग्रंथाचे पुन्हा नव्याने स्पष्टीकरण हिने सादर केले. स्त्रियांचा आत्मा आणि पुरूषांचा आत्मा समान असे स्पष्टीकरण ती देते. [४]

मेरी ॲस्टेल:

इ.स. १६३३ ते इ.स. १७३१ मध्ये इंग्लंडमध्ये होऊन गेलेली मेरी, ॲस्टेलने सभ्य स्त्रियांसाठी गांभीर्यपूर्वक प्रस्ताव आणि रिफ्लेक्शन अपॉन मॅरेज या ग्रंथात ती कुटुंबसंस्थेअंतर्गत पुरूषांची सत्ता आणि वर्चस्व मान्य करते. परंतु विवाहशिवाये अन्य पर्यायांचाही स्त्रियांनी विचार करावा, असे सूचवित. मेरी ॲस्टेल स्वत: अविवाहित राहिली आणि तिला सरदार - उमराव गटातील उच्चभ्रू स्त्रियांसारख्या अनेक जणींचा पाठिंबा मिळाला. [५]

ली जु - चेन:

चीनमध्ये इ.स. १७६३ ते इ.स. १८३० मध्ये झालेल्या ली जु - चेन आरशातील फुले (१८००) या आपल्या कादंबरीत स्त्रीचे होत जाणारे वा वाढत जाणारे वस्तूकरण आणि त्यावरील परखड स्त्रीवादी चिकित्सा केली. स्त्रियांकडे वस्तू म्हणून पाहणे, पायबंदीची क्रूर, अमानवी सामाजिक प्रथा आणि स्त्रियांचा प्रतिरोध नष्ट करण्यासाठी स्त्रियांचा झालेला शारीरिक छळ या सर्वाविरूध्द ली-जु-चेन यांनी आपल्या कादंबरीमधून लिहिले. स्त्रीने बाकी सर्व सद्गुणांना तिलांजली देऊन केवळ स्वत:ची शरीरता आणि स्वत:चे सौंदर्य याकडे लक्ष द्यावे, असे मानले जात अठराव्या शतकातील चीनच्या पटावर ही कादंबरी घडते. [६]

साराह एम. ग्रिमके :

युनायटेड स्टेट्समधील साराह एम. ग्रिमके यांचा काळ म्हणजे १७९२ ते १८७३ हा होय. साराह आणि ॲंजेलिना यांचा जन्म गुलाम बाळगणाऱ्या दक्षिणेतील कुटुंबात झाला. या भगिनीनी गुलामगिरी विरोधी चळवळीत भाग घेतला, लिखाण केले. त्यामुळे सनातनी स्त्रिया व धर्मगुरुंनी त्यांचा निषेध केला. स्त्रियांसाठी पुरूषांच्या एकत्र सभेमध्ये बोलणे, स्त्रियांना त्यांचे घरकाम आणि धार्मिक कार्य यापासून परावृत्त करणे, स्त्रियांनी गुलामगिरी नष्ट व्हावी यासाठी सरकारकडे अर्ज करावे, असे प्रयत्न या भगिनीनी केले. [७]

१९३७ सालच्या एका लिंगाच्या समानतेबद्दल पत्रांत साराह म्हणजे, घरगृहस्थीचे ज्ञान हा स्त्री शिक्षणाचा आवश्यक असाच भाग आहे. या शिक्षणामुळेच स्त्री ही कुटुंबाची मुख्य कर्ती होते. स्त्री विवाहित असो वा एकटी, तिची कर्तव्ये, जबाबदाऱ्या समजून उमजून पार पाडत असेल तरच तिचे कुटुंब, तिची माणसे आनंदी होती. [८]

या पत्रात ही गुलाम स्त्रियांविषयी तसेच गोऱ्या स्त्रियांच्या नैतिक शुध्दतेविषयी ही अनेक प्रश्न उपस्थित करते.

फ्लोरा ट्रिस्टन:

१८०३ ते १८४४ या काळात फ्रान्स मध्ये होऊन गेलेली स्त्रीवादी लेखका फ्लोरा ट्रिंस्टनने कामगार वर्गातील स्त्रियांची मुक्ती या लेखाद्वारे १७९८ च्या फ्रेंच राज्यक्रांतीविषयी आणि त्यामुळे सामान्यांनी पुढे आणलेल्या राईट्स ऑफ मॅनची चर्चा केली आहे. प्रोलेतेरिअन स्त्रीला आजही आपल्या पतीपुढे गुलामासारखे राहावे लागते. प्रोलेतेरिअन स्त्रीला आजही आपल्या पतीपुढे गुलामासारखे राहावे लागते, जणू तिचा नवरा हा तिचा मालकच आहे. या प्रोलेतेरिअन स्त्रियांला स्वत:ला पुरेसा आधार देऊ शकत नसल्याचे अपरिहार्य विवाह करतात. ट्रिस्टनने पुरूष कामगारांना आवाहन केले की, स्त्रियांना शिक्षणाचा हक्क दिला तर सर्वच कामगार वर्गाचा दर्जा सुधारेल कारण शिकलेल्या कामगार स्त्रिया या चांगल्या माता बनतील आणि आपल्या मुलांना आणि मुलींना चांगल्या प्रतीचे, उच्च दर्जाचे जीवन प्रदान करू शकतील. [९]

एलिझाबेथ कॅडी स्टॅटन:

१८१५ ते १९०२ या काळात युनायटेड स्टेट मध्ये होऊन गेलेल्या एलिझाबेथ कॅडी स्टॅटन यांनी

भावनांचे आणि ठरावांचे प्रकटीकरण याद्वारे स्त्रियांच्या हक्काची मागणी केली. स्त्रियांना शिक्षणासाठीचा हक्क आणि संधी, संपत्तीमध्ये हक्क, नोकऱ्या आणि राजकारणात सहभाग अशा मागण्या पुढे आणल्या. [१०]

सुझन बी ॲथनी :

युनायटेड स्टेटच्या १८२०-१९०६ मध्ये होऊन गेलेल्या सुझन बी. ॲथनी यांनी १८७० च्या दशकात संपूर्ण युनायटेड स्टेटसमध्ये सामाजिक शुध्दता या विषयावर भाषणे दिली. सामाजिक शुध्दता म्हणजे स्त्री आणि पुरूष दोन्ही लिंगासाठी समान नैतिकता असली पाहिजे, ज्यामध्ये चारित्र्य आणि विवाहातील एकनिष्ठा यांचा समावेश आहे. कमेन्स ख्रिश्चन टेम्परन्स युनियनचे सभासद ज्या प्रकारे अतिरेकी मद्यपानाचा आणि लैंगिक गैरवर्तनाचा संध जोडतात. त्याप्रमाणे ॲथनी यांनीही असा संबंध जोडून त्यातून बाहेर येण्यासाठी पुरूषांनी उच्च नैतिकतेचा पुरस्कार करण्याची गरज प्रतिपादन केली. [११]

किशिदा तोशिको :

जपानमध्ये १८६३ ते १९०१ या काळात होऊन गेलेल्या किशिदा तोशिको यांनी पेटाऱ्यातील मुली या व्याख्यानात मांडले की, मध्यमवर्गीय मुलींचे असे उल्लेख (पेटाऱ्यातील मुली) वारंवार येतात. कारण या मुली एखाद्या पेटीमध्ये ठेवलेल्या शोभेच्या वस्तूच आहेत. त्यांना हात, पाय, गळा असेल परंतु त्याचा काहीही उपयोग नाही. कारण त्यांना मर्यादित स्वातंत्र्य प्रदान केलेले असते. त्यामुळेच त्यांची अभिव्यक्तिही निरर्थक ठरते. केवळ मुलींसाठीच पेटाऱ्यांची निर्मिती होते, असे पेटारे निर्माण करणाऱ्या मुलींच्या पालकांची आपल्या मुलीचे स्वातंत्र्य मर्यादित करावे, अशी इच्छा नसते. [१२]

निष्कर्ष :

१. जगभरामध्ये स्त्रीविषयक दुय्यमत्वाचा वेध विविध स्त्रीवादी साहित्यातून घेतला आहे.

२. स्त्रीला अभिव्यक्ती, स्वातंत्र्य मिळावे असा रोख साहित्यातून पुढे येतो.

३. स्त्रीला विविध स्वातंत्र्य व मानवतेचा दर्जा मिळावा हे या साहित्यातून पुढे येते.

४. जगभरामध्ये स्त्रियांनी दुय्यमत्वाविरोधी लढा उभारला.

५. प्रारंभीचे साहित्य पुढील काळात स्त्री हक्कांच्या मागणीसाठी दिशादर्शक ठरले.

सारांशत :

याप्रमाणे विविध स्त्रीवादी लेखकांनी तत्कालीन स्त्रीविषयक दुय्यमत्वाचा वेध आपल्या साहित्यातून घेतलेला आहे.

संदर्भसूची:

१. चव्हाण प्रवीण (स्वैर अनुवाद) : प्रारंभीचे स्त्रीवाद संदर्भ साहित्याचा वेध, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, साहाय्याने उच्च शिक्षण उपक्रम, नवाजबाई रतन टाटा ट्रस्ट, वर्षे २०११, पृ. २०

२. कित्ता, पृ. २७

३. कित्ता, पृ. २८

४. कित्ता, पृ. ३३

५. कित्ता, पृ. ३८

६. कित्ता, पृ. ४२

७. कित्ता, पृ. ५६

८. कित्ता, पृ. ५८

९. कित्ता, पृ. ६२

१०. कित्ता, पृ. ६७

११. कित्ता, पृ. ७४

१२. कित्ता, पृ. ८३